PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 8, ISSUE 1

# आधुनिक भारताच्या इतिहासातील आध्यात्मिक प्रबोधनकारांच्या आत्मचरित्रांमधील 'भक्ती' संकल्पना

**डॉ. राजेश यशवंत कुलकर्णी**
(इतिहास विभाग प्रमुख)
मॉडर्न कॉलेज, शिवाजी नगर, पुणे,
**महाराष्ट्र भारत**

## प्रास्ताविक

भक्तीला हिंदूंमध्ये फार मोठे स्थान आहे. उदात्त जीवन विद्या देणारा मार्ग म्हणून भक्तीकडे पाहिले जाते. व्यक्ती, मानवता यांच्या आत्मिक विकासार्थ भक्तीने मोठे कार्य केले आहे. भक्तीचा उदय वेदांमध्ये मानला जातो. प्राचीन- मध्ययुगीन काळात भक्ती परंपरा प्रवाह निरंतर बहरत राहिला. आधुनिक भारतातही, विविध प्रांतांमध्ये भक्ती ही अखंड राहिली.

प्रस्तुत संशोधनात, आधुनिक भारताच्या इतिहासातील भक्तीचे स्वरूप शोधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी आधुनिक भारतातील अध्यात्मिक प्रबोधनकारांच्या आत्मचरित्रातील "भक्ती" संकल्पना अभ्यासली आहे.

महाराष्ट्रातील वारकरी, महानुभाव, धारकरी, दत्तात्रेय तसेच कर्नाटकातील वीरशैव, उत्तरेतील संकीर्तने, बंगालमधील चैतन्य संप्रदाय, शीख परंपरा यात भक्ती ओतप्रोत आहे. आधुनिक अध्यात्म प्रबोधक व मार्गदर्शकांनी भक्तीचे घडविलेले दर्शन व चिंतन हे त्यांच्या आत्मचरित्रांतून प्रकट झाले आहे.

## भक्तीचे मार्ग व प्रवाह

भक्तीचे विविध मार्ग-प्रवाह-शाखा आहेत.

- भागवत भक्तीचे नऊ मार्ग असे-

श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन
या नऊ पायऱ्या मानून त्यावरून भक्त आपले ध्येय साधू शकतो असे मानले आहे.

- राजसिक, सात्विक, तामसिक असेही मार्ग भक्तीचे मानले गेले.
- गौणी भक्ती आणि पराभक्ती असेही स्तर भक्तीचे सांगितले गेले.
- केवळ "नाम" (सतनाम-ॐ) हा देखील भक्तीचा मार्ग मानला गेला. - सर्वांना सहजपणे जमेल, समजेल, पटेल आणि प्रपंचात राहूनही ईश्वर साधना करता येईल. असा हा भक्तीचा मार्ग होय.

भक्तीचे अनेक मार्ग व प्रकार आहेत. आधुनिक भारतातील अध्यात्म मार्गदर्शकांच्या-प्रबोधनकारांच्या आत्मचरित्रात त्यावर सूक्ष्म प्रबोधन आहे.

## भक्तीची पार्श्वभूमी

प्राचीन भारतापासूनच भक्तीचा उदय व अवलंब आढळतो. ऋषी, मुनींनी देवतांच्या केलेल्या स्तुती- प्रार्थना या भक्ती स्वरूपच आहेत. वेदांमध्ये भक्ती आहे. भगवतगीता, पुराणे यातही भक्ती ही भावऊर्जा आहे. संपूर्ण भारतभर 'भक्ती'ही महत्त्वाची होती व राहिली आहे. प्राचीन काळी शैव, शाक्त, वैष्णव यामध्ये ती नांदत आली. राम व कृष्णाची भक्ती या स्वरुपात ती होती. विविध देवदेवतांची आराधना भक्तीद्वारे होत राहिली.

मध्ययुगीन भारतातही भक्तीची पवित्र चैतन्यमय परंपरा प्रवाहित राहिली. शैव, लिंगायत, शीख, वैष्णव, वारकरी, धारकरी, दत्त मार्गी, महानुभाव अश्या मार्गाद्वारे ती भारतातील विविध प्रांतात बहरत राहिली. मध्ययुगीन भारतात संत , महात्म यांनी भक्ती चैतन्य कायम ठेवले.

महाराष्ट्रात वारकऱ्यांच्या दिंड्या, कर्नाटकात बसवेश्वर, अल्लमप्रभुंचे कार्य, बंगालमध्ये कृष्णचैतन्य, उत्तरेत रामानंद-तुलसीदास-मीरा-कबीर यांनी भक्तीची ध्वजा फडकवली. दक्षिणेत अलवार-नलवार परंपरेतील संतांनी तर त्यात भरच टाकली. तमिळनाडूत रामानुजनांच्या वैष्णव अनुयायांनी भक्तिची लहर प्रज्वलित ठेवली. मध्वाचार्य आणि त्यांच्या शिष्यांनी वैष्णव परंपरेत मोठी भर टाकली. वल्लभाचार्य यांनी विजयनगर काळात भक्ती प्रज्वलीत केली.

मध्ययुगात शंकराचार्य, निंबाकाचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य यांनी भक्तीचे तत्त्वज्ञानही विशद केले.

आधुनिक भारतात भक्ती परंपरा अक्षुण्ण-अखंड-अविरल राहिली.

## गृहितके

प्रस्तुत संशोधनात काही गृहितके मांडली गेली होती ती अशी -

- प्राचीन, मध्ययुगीन भक्ती परंपरा आधुनिक भारतातही प्रवाहित राहिली.

- भक्ती संकल्पना ही बहुआयामी असून, भक्तीचे वेगवेगळे मार्ग हे आधुनिक भारतात राहिले .
- अध्यात्म प्रबोधकांनी आपल्या आत्मचरित्रांद्वारे भक्तीतील सूक्ष्म घटकांचे विवेचन केले होते.

## उद्देश

आधुनिक भारतीय अध्यात्म प्रबोधकांच्या 'भक्ती' संकल्पनेचा शोध व बोध घेताना पुढील उद्देश समोर ठेवले होते-

- प्रबोधकांच्या 'भक्ती' संकल्पनेचे संकलन करणे.
- अध्यात्म मार्गदर्शकांच्या 'भक्ती'चे तत्त्वज्ञान जाणणे, प्रकट करणे.
- भक्ती मार्गाबाबतच्या विविध पद्धती व प्रकारांवर प्रकाश टाकणे.
- अध्यात्म मार्गदर्शकांनी भक्ती बाबत दिलेल्या संदेशाची चिकित्सा करणे.
-

## संदर्भ साधने

अध्यात्म, योग या क्षेत्रात आत्मचरित्रे ही अगदी दुर्मिळ पणे आढळतात. अनुयायी, शिष्य हे आपापल्या मार्गदर्शकांची पत्रे, स्मृती तेवढ्या संकलित करतात. परंतु हे कामही तसे दुर्मिळ होते. प्रस्तुत संशोधनात आधुनिक भारतातील अध्यात्मिक प्रबोधक , मार्गदर्शकांची आत्मचरित्रे संकलित करून त्यातील भक्तीची सूत्रे, संदेश व शिकवणूक संकलित, शोधीत केली आहे. त्यामध्ये लाहिरी महाराजांच्या डायरीज, परमहंस योगानंदांचे आत्मचरित्र, रामकृष्ण परमहंसांची स्मृती कथने, स्वामी राम यांचे आत्मचरित्र, कर्मयोगी गांधीजींची आत्मकथा, स्वामी मुक्तानंद यांची आत्मकथा, जी.के. प्रधान यांनी केलेले लेखन, श्री.एम. यांचे आत्मचरित्र यांचा समावेश केला आहे.

आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये **श्री स्वामी विवेकानंदांनी** " भक्तीयोग " यावर भाष्य केले आहे.

ईशोपोनिषद, नारदीय भक्तिसूत्रे, गीता, श्वेताश्वर उपनिषद आदींचा संदर्भ त्यात आहे. भक्ती हा प्रेमाचा, हृदयाचा, भावनांचा मार्ग आहे. हे कथन करताना विवेकानंदांनी 'भक्तियोग' या ग्रंथात पुढील घटक स्पष्ट केले _

- प्रार्थना
- भक्तीची लक्षणे
- ईश्वराचे स्वरूप भक्ती योगाचे ध्येय व प्रत्यक्ष अनुभूती
- गुरुची आवश्यकता
- गुरु शिष्य
- मंत्र ॐ (शब्द व ज्ञान)
- प्रतिक व प्रतिमा उपासना

- ईश्वरनिष्ठा
- भक्तीची साधने

पराभक्ती या विभागात विवेकानंदांनी त्याग, प्रेमजन्य वैराग्य, भक्ती योगाची स्वाभाविकता व रहस्य, भक्तीच्या अवस्थेतील भेद, सार्वजनिक प्रेम, पराविद्या, पराभक्ती, त्रिकोणी प्रेम, प्रेम हाच प्रभू, दैवी प्रेम यावर प्रकाश टाकला आहे.

ज्ञानयोग (बौद्धिक), कर्मयोग (कृतिशील), हठयोग (शारीरिक), राजयोग (आंतरिक अनुसंधानात्मक) आणि भक्ती (प्रेमयुक्त) यावर विवेकानंदांनी विवेचन केलेले आढळते.

**योगीराज श्याम चरण लाहीरी महाशय** हे महान क्रिया योगाचे गुरु होते. त्यांच्या डायऱ्यांवरुन त्यांच्या नातवाने त्यांचे चरित्र लिहिले. ते आत्मचरित्र नसले तरी त्यातील डायरीज चे संदर्भ हे अस्सल साधं म्हणता येईल. योगी राजांनी योगाचा भक्तीचा दृष्टिकोण प्रस्तुत केला आहे.

योगीराज यांच्या मते हे "जीभ" एक इंद्रिय आहे आणि इंद्रिया द्वारे केलेले किर्तन गौण स्वरूपाचे आहे. परंतु त्यामुळे जीव हळूहळू शुद्ध होत जाईल आणि मनात भक्ती आणि श्रद्धा विस्तारेल. परंतु गुरु मार्गदर्शनात षड्चक्रांमधून -इडा, पिंगाले मधून आणि सुषुम्ने द्वारे वर प्रवासातच स्वर्गातले द्वार आहे. ब्रम्हांडातील सारे काही मानवी शरीरात आहे. यासाठी ते श्रीकृष्णाच्या मूर्तीचे उदाहरण देतात. "भगवंताच्या हातात बासरी आहे त्याला सहा छिद्रे आहेत; ती षड्चक्रांचे प्रतीक आहेत. वरील फुंकेचे जे छिद्रे आहेत ते सहस्त्राराचे प्रतीक आहे. त्या बासरीला फुंकून वाजवावे लागते. षड्चक्रांतर्गत करावयाच्या अंतर्मुख वायू क्रिया रूप प्राणायामाचे ते प्रतीक आहे. हा प्राणायाम करताना कूटस्थाचे दर्शन होते. श्रीकृष्णाच्या डोक्यावरील सुशोभित करणारे मोरपीस त्याचे प्रतीक आहे, आणि त्या मोरपिसातील डोळा हे त्या कूटस्थाचे प्रतीक आहे. श्री कृष्ण त्रिभंग मुरारी च्या स्वरूपात उभे आहे. ते त्रिभंग रूप आहे. ते जिव्हा ग्रंथी, हृदय ग्रंथी, तसेच मुलाधार ग्रंथी अथवा क्रमशः ब्रम्हा ग्रंथी, विष्णू ग्रंथी, आणि रुद्र ग्रंथी यांच्या भेदनाचे प्रतीक आहे. त्यांची देह मुद्रा ही ओंकाराचे प्रतीक आहे. अशाप्रकारे श्री कृष्णाचे भजन योगतंत्रच प्रकाशते.

कबीरांप्रमाणे गृहस्थी जीवनाचे पालन करीत योगिराज लाहिरी महाराजांनी योगसाधना केली. लाहिरी महाराजांनी अध्यात्माच्या साम्राज्यात स्वतंत्र असा साधना मार्ग दाखविला आहे. तसेच त्यांचे नातू सत्य चरण लाहिरी यांनी तो प्रवास प्रकट केला आहे.

**श्री परमहंस योगानंद** (5 जाने.1893/7 मार्च 1952) यांनी 'योगी कथामृत' हे आपले मूळ आत्मचरीत्र बंगालीत लिहीले आहे. विविध जागतिक भाषांमध्ये त्याचे अनुवाद जगभर गाजले. अमेरीकेत, कॅलिफोर्निया येथे त्यांनी समाधी घेतली. आपल्या जीवनात त्यांनी जगभर "क्रियायोगाचा" प्रचार-प्रसार केला. आपल्या आत्मचरीत्रात त्यांनी त्यांचा अध्यातिक जीवनप्रवास वर्णन केला आहे. भक्तीबाबत ते लिहीतात, "सर्व धर्मातील महात्म्यांनी विश्वप्रेमी जगदंबेमध्ये ईश्वराचे साधुसुधे स्वरुप प्रतीत झालेले मानून व त्या रुपाची भक्ती करून ईश्वर

साक्षात्कार प्राप्त करुन घेतलेला आहे. कारण तत्त्व हे निर्गुण व अचित्य आहे; त्याला काही गुणधर्म नाहीत व त्याचे स्वरुप आकलन करता येत नाही. मानवी कल्पनेने व तळमळीने जगन्मातेच्या स्वरुपात त्याचे सगुण स्वरुप कल्पिलेले आहे. कैवल्याचे तत्वज्ञान व सगुण भक्ती यांचा हिंदू तत्वज्ञानामध्ये प्राचीन काळापासून फारसुंदर मिलाफ घडवून आणलेला आहे.” असे विचार दर्शन व्यक्त करुन परमहंस योगानंद आपल्या आत्मचरीत्रात ‘भक्ती व ज्ञान’ हे मूलत: एकच असल्याचे म्हणतात. आश्रय घेणे, संपूर्णत: ईश्वरास शरण जाणे यामुळे सर्वोच्च ज्ञान प्राप्ती होते, अशी भक्तीमय भूमिका ते घेतात. वेद, उपनिषदे, गीता यांमध्ये भक्ती तत्व ज्ञान जागोजागी असल्याचे ते नमूद करतात.

परमहंस योगानंदांच्या मते योगाभ्यास आणि शुध्द भक्तीने साधकाची मानसिक संवेदन क्षमता चांगली व्यापक होऊन तो सर्वव्यापक विराट अनुभवू शकतो . आपल्या गुरुंबरोबरच्या व साधना प्रवासातील भक्तीचे अनुभव देखील त्यांनी आपल्या आत्मचरीत्रात मांडले आहेत.

**कर्मयोगी महात्मा गांधीचे** "सत्याचे प्रयोग" अथवा "आत्मकथा" ही भारतात व जगात एक महत्त्वाचे पुस्तक मानले जाते. गांधीजी ‘सत्य’ व ‘अहिंसा’ या अध्यात्म मुल्यांवर जगले. महात्मा गांधींना राजकारणातील अध्यात्म मार्गदर्शक म्हणता येईल. गांधीजींच्या जीवनावर गीतेचा मोठा प्रभाव होता. गीतेमध्ये कर्म, ध्यान, योग, भक्ती या चार सूत्रांचे निरुपण आहे. त्यांचा प्रभाव गांधीजींच्या जीवनात व तत्त्वज्ञानात आढळतो. गीतेबाबत गांधीजी हे आरंभापासून जिज्ञासू होते. गीताभ्यासाबाबत ते लिहीतात - “कोणाबरोबर विवेकानंदांचा तर कोणाबरोबर मणिलात नभुभाईंचा "राजयोग" वाचू लागलो. एका मित्राबरोबर "पातंजल दर्शन" वाचावे लागले. पुष्कळांबरोबर गीतेचा अभ्यास सुरु केला. "जिज्ञासू मंडळ" नावाचे मंडळ स्थापले आणि नियमीत अभ्यास सुरु केला. गीतेवर माझे प्रेम आणि श्रध्दा होतीच; आता तिच्यामध्ये खोल उतरण्याची आवश्यकता भासू लागली. माझ्यापाशी एकदोन भाषांतरे होती. त्यांच्या सहाय्याने मूळ संस्कृत समजून घेण्याचा प्रयत्न केला.”

पुढे गांधीजी लिहीतात की भगवत गीता हा त्यांच्या आचरणाचा एक श्रेष्ठ मार्गदर्शक झाला. गीता त्यांचा धार्मिक कोष झाला, असेही त्यांनी "सत्याचे प्रयोग" या आत्मकथेत म्हटले आहे.

**पॉल ब्रन्टन** (21 ऑक्टो 1898 ते 27 जुलै 1981) यांनी "A Search In Secret India" हा ग्रंथ लिहिला. त्याचा मराठी अनुवाद “भारताच्या आध्यात्मिक रहस्याच्या शोधात” या नावाने प्रसिध्द झाला. या अध्यात्मिक प्रवास वर्णनाचे स्वरुप पॉल ब्रन्टन यांच्या जीवनाशी जोडले गेल्यामुळे त्याचा संदर्भ येथे घेतला आहे. आपल्या भारत भेटीत पॉल ब्रन्टन अनेक अध्यात्मिक विभूतींना भेटले. त्यापैकी रमण महर्षींची, अरुणाचलची भेट प्रभावी ठरली. रमण महर्षींनी त्यांना सांगीतले की - कोणत्याही व्यक्तीने स्वत:स “कोऽहम” (मी कोण आहे?) असा प्रश्न विचारीत रहावे आणि त्याला कळू लागेल की तो शरीर, डोके, वासना, विचार, श्वास असे काहीही नाही. त्याच्या अंतर्यामातूनच त्याला स्व:बोध होईल.

रमण महर्षी यांनी या साधना प्रवासाबाबत म्हटले -

"म्हणजे सूर्यप्रकाशासारखा सत्याचाप्रकाश तुमच्या अंत:करणात भरुन राहील. मनाला त्रास असा वाटणार नाही आणि मन खऱ्या सुखाने भरुन जाईल. कारण सुख व स्वत:विषयीचे ज्ञान-आत्मबोध ही एकच आहेत. हा आत्मबोध झाला म्हणजे मग तुमच्या मनात संशय असा उरणार नाही."

रमण महर्षींच्या मते, "कोऽहं" (मी कोण?) हा साधना प्रवास भक्तीमय असावा, रुक्ष-बौध्दीक-तार्कीक नसावा. त्यात भक्तीरस-जागृतीचा चैतन्यमय प्रकाश - सजग, सरलता असावी.

पॉल ब्रन्टन यांनी हा अनोखा मार्ग लिहून ठेवला आहे.

**जी.के.प्रधान** यांनी "Towards the Silver Crests of the Himalaya" हे पुस्तक लिहीले आहे. अध्यात्म प्रवासी माधव यांच्या दैनंदिनीचे रुपांतर आत्मचरीत्र स्वरुपात आले आहे. त्याचा अनुवाद "साद देती हिमशिखरे" या नावाने मराठीत अत्यंत लोकप्रिय ठरला. अनेक पिढ्या हे आत्मचरित्र वाचत आल्या आहेत.

'भक्ती' मार्गातही संसाराचे व अन्य सर्व पाश तोडावेच लागतात, असे चरीत्र नायकाचे मत आहे. त्याबाबत चरीत्र नायक म्हणतात - "भक्ती मार्गानेच मुक्ती मिळविलेल्या अनेक साधुपुरुषांची चरीत्रे मीही वाचली आहेत. पण मला त्यात आढले ते हेच की त्यांनी आपले मन संसारातून काढून वैराग्यानेच संसार केला आहे. समाजातील त्यांचे अस्तितत्व केवळ ते शरीरानेच हाते इतकेच.

चरीत्र नायकाच्या मते भक्तीमार्गातही संसार पाश तोडण्याशिवाय आत्मदर्शन घडू शकत नाही. संसार साधून ईश्वरभक्ती करुन ईश्वरात लीन होता येते हा समज सामान्य प्रापंचिक लोकांमध्ये असतो. परंतु प्रपंचाचा पाश 'मुक्ती' देऊ शकत नाही असे चरीत्र नायकाने मत परखडपणे मांडले आहे. भक्तीची केवळ भावना वेगळी आणि आंतरीक तळमळीतून - सगुण, निर्गुण भक्ती साधून मुक्ती मिळविणे हे वेगळे, अशी भूमिका चरीत्र नायकाची आहे. संसार टाकून परमार्थाची कास धरावी आणि अखेरीस हिमालयातील गुहेत, जेथे नियतीने आपली जागा राखून ठेवली. तेथे जाऊन परमात्म्याशी अनुसंधान साधावे अशी ओढ एका अत्यंत बुध्दीमान आणि दर्जेदार खेळाडू तरुणाचा म्हणजे माधवास लागते. त्या अध्यात्मयात्रेचा प्रवास कादंबरी स्वरुपात मांडला आहे.

**स्वामी मुक्तानंद** (16 मे 1908 ते 2 ऑक्टो. 1982) हे गणेशपूरी गुरुदेव सिध्दपीठाचे प्रमुख होते. सिध्द मार्गाची साधना व अध्यात्मिक जीवन प्रवासावर त्यांनी "चिद्‌शक्ति विलास" हे हिंदी पुस्तक लिहिले ते लोक साधनेचे मार्गदर्शनपर असेच आहे.

"प्रेमयोग" म्हणजेच "भक्तीयोग" , प्रेम मार्ग म्हणजे भक्ती मार्ग होय, असे स्वामी मुक्तानंद मानतात. प्रेमाशिवाय परमात्मा असंभव, दोन्ही एकच आहेत असे सांगतांना ते आपल्या आत्मचरीत्रात लिहीतात - "प्रेम साधना एक उच्च साधना है। प्रेम को भक्ती भी कहते है। प्रेम एक महान, स्फूर्तीमय, गतीशील अन्त:स्फुरण है। प्रेम परमात्मा का स्वरुप है जिसको शास्त्रकारोंने परमानन्द, सच्चिदानंद कहा है। वह मानवके अन्दर पूर्ण रुप से रहता है। यदि मानवको प्रेम की प्रचिती, अनुभूती में न भी आये तो भी उसमें प्रेम परीपूर्ण है"

प्रेम अमृतरुप आहे, अमर आहे. गोकुळातल्या गोपींनी प्रेमापासूनच परमात्मा प्राप्त केला होता, असे स्वामी मुक्तानंद म्हणतात. प्रेम हे शुध्द, संबंध रहित आणि निष्काम असावे असे त्यांना वाटे. प्रेमात काही 'इच्छा' असल्यास ते सत्य प्रेम नव्हे. प्रेमात स्वार्थ नसतो. प्रेम केवळ प्रेम असते. व्यक्तीने मलिन, शुष्क, असत्य, अनित्य, विचारी, वासनायुक्त राहू नये तर भक्तिपूर्ण (प्रेमपूर्ण) रहावे असे त्यांनी म्हटले आहे. प्रेम घेतल्याने नव्हे तर दिल्याने वाढते. 'आपला-परका' हा भेद प्रेमातील बाधा आहे, प्रेम प्रत्येक चराचराशी असावे असे ते चरित्रातील 'प्रेम-साधना' या प्रकरणात म्हणतात -

शरीर हे आत्म्याचे सेवक आहे, त्यालाही मित्रासम व पवित्र ठेवावे असे मुक्तानंद म्हणतात. मन केवळ परमात्म्यापाशीच शांती-विश्रांती घेते, असेही मर्म ते सांगतात. प्रेम हे परमात्म्याचे रुप आहे असे सांगतात. प्रेम हे परमात्म्याचे रुप आहे असे संबोधून ते प्रेममय अर्थात भक्तिमय जगण्यास सांगतात. प्रेम हे मानवाचे आत्मरुप आहे, जीवन सौंदर्य आहे असे म्हणतात.

**स्वामी राम** (1925 ते 1996) यांनी "Living with the Himalayan Masters" हा जीवनचरीत्र पर ग्रंथ लिहीला. त्याचा अनुवाद "हिमालयातील महात्म्यांच्या सहवासात" हा खूप लोकप्रिय झाला. स्वामी राम यांनी आपल्या जीवनात भेटलेल्या योगी, संत, तपस्वी, लोक अवतारांविषयचीचे अनुभव कथन केले आहे. विविध साधना मार्गांचा तपशीलही त्यांनी कथन केला आहे. भक्ती बाबत ते म्हणतात - "आत्मसाक्षात्काराचे अनेक मार्ग आहेत. परंतु योगशास्त्रानुसार सहा प्रमुख मार्ग आहेत. त्यापैकी भक्ती एक आहे. भक्ती पंथ म्हणजे शरणता"

स्वामी राम भक्ती मार्गाचे मर्म विषद करतांना त्यातील सूक्ष्म अध्यात्म प्रवासही उलगडून सांगतात. ते लिहीतात - "भक्ती योग हा आत्मसमर्पण, ईश्वराविषयी परम पूज्यभाव आणि भूतमात्रांविषयी करुणा यावर आधारलेला असतो. नम्रता, ऋजूता, साधेपणा, प्रामाणिकपणा हे या मार्गात आवश्यक गुण मानले जातात. या मार्गात भावनेची सर्व शक्ती देवाच्या दिशेने संक्रमित केली जाते. एकत्र भजन करतांना, ईश्वराविषयी बोलतांना या मार्गातील साधकांच्या डोळ्यात अश्रू उभे राहतात. तत्वज्ञानाच्या दृष्टीने या पथावर भक्त आपली व्यक्तीचेतना ईश्वरतत्वात विलीन करीत नाही. द्वैत ठेवून आपण दास आहोत असा मधुरभाव स्वीकारतो".

भक्ती ही डोळस असावी. याबाबत स्वाम राम यांनी परखड व जागृत भूमिका घेतली. ते लिहीतात - "देवाच्या अदगी निकट असणे म्हणजे समीपता. ही या संप्रदायात मुक्ती मानली जाते. मुक्ती म्हणजे ईश्वरीय चेतनेच्या प्रदेशात ईश्वराच्या अत्यंत निकट राहण. या मार्गाचा अंगिकार खूप लोक करतात, पण त्याचं मर्म सर्वांना कळतं अस नाही. भक्तिमार्ग अवघड आहे. केवळ अंधभक्ती करणाऱ्यांना तो उमजणार नाही."

स्वामी राम हे साथ व भ्रम यातील भेद दर्शवितात.

**कृष्णाजी केशव कोल्टकर** (14 जाने- 26 एप्रिल 1975) यांनी भारतीय मानसशास्त्र (पातंजल योगदर्शन) हा ग्रंथ लिहिला. त्याबद्दल त्यांना डी.लिट. पदवीने गौरविण्यात आले. हा ग्रंथ त्यांच्या जीवनप्रवासाशी संबंधित आहे. त्यामुळे त्याचा संदर्भ येथे घेतला आहे.

कोल्हटकर 'चित्त' निर्मलतेस मुक्तीचा मार्ग मानतात. त्यासाठी राजयोगातील मर्म सांगतांना ते म्हणतात की, साधक कितीही परमार्थी असला तरी शौच, स्नान, भिक्षा, निद्रा, इत्यादी देहास आवश्यक व्यापार त्याला करावेच लागतात. प्रारब्धानुसार जगत् व्हहार चालू असतांना चित्ताच्या प्रसन्नतेसाठी, चित्तमल (बहिर्मुखी झाल्याने) करण्यासाठी, दौर्मनस्य निरास करण्यासाठी योगसाधना आहे. त्यासाठी -

- सुखाशी मैत्री आणि दु:खाची करुणा
- पुण्याचा हर्ष आणि पापाची उपेक्षा

या भावनांमुळे, मन सत्वगुणी राहून निर्वेधपणे साधना अभ्यास चालू राहतो.

उपेक्षा, करुणा, मुदिता व मैत्री या चार भावांचे महत्त्व कोल्हटकरांनी वर्णन केले आहे. या भावना म्हणजे भक्तीयोग" होय. भक्तीयोग साधना ही त्यादृष्टीने राजयोग, हठयोग, अन्य साधनांसाठीही पूरकच आहे.

भक्तीमार्ग हा "भक्तीयोग" या स्वरुपात यातून प्रक्षेपित होतो.

**मुमताज अली खान उर्फ श्री.एम.** (जिवीत) यांनी "Apprenticeship to a Himalayn Master" या पुस्तकाचा मराठी अनुवाद "हिमालयासी गुरुच्या योगी शिष्याचे आत्मकथन" या नावाने सध्या लोकप्रिय आहे. हे एक उत्तम दर्जाचे अध्यात्मिक आत्मचरित्र मानले जाते. आपल्या अध्यात्मिक जीवन सफरीतील अनेक भेटी, अनुभव यांच्या कथा या आत्मचरीत्रात श्री.एम. यांनी लिहील्या. सुफींमधील भक्तीभावाचे वर्णनही त्यांनी केले. ते म्हणतात - "सुफी भक्तीमार्गाची भारतात नंतर जी लाट उसळली त्याचे श्रेय ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांना. ते भारतातील आद्य पुरस्कर्ते म्हणता येतील."

सूफींच्या भक्तीसाधनेतील संगीताचे महत्त्व श्री.एम.यांनी विषद केले आहे. ते म्हणतात - "सूफी संप्रदायातील चिश्ती पंथात संगीताचा खूप वापर होतो. वाद्यवादन व गायन हे त्यांच्या अध्यात्मिक साधनेमधील महत्त्वाचे अंग समजले जाते. ते जर योग्य तर्हेने सादर केले तर गायक व श्रोतेही एका अमर्याद जाणिवेच्या अत्यानंदाच्या अवस्थेत जाऊन पोहचतात. या प्रकाराला 'समा' म्हणतात. प्रेमासाठी सर्वस्वाचा त्याग करणे हे तत्त्व चिश्ती संप्रदायाच्या विचासरणीच्या मुळाशी आहे."

आपल्या आत्मचरीत्रात श्री.एम. यांनी भक्तीचे अंत:रंग विषद केले. याबाबत त्यांना वाटते की, आपल्याला स्वत:चे सत्त्व समजावे म्हणजे परमेश्वर जाणला. 'स्वत्व' (अध्यात्मिक हृदयभावना) समजावी व तिची जागृती कशी

करायची हे भक्ती शिकविते. दरवेशी पंथाचे सूफी ध्यान, रुमींचे काव्य, नक्षबंदी-सुरहावर्दी परंपरेतील गुरुंचे लेखन याबाबतही त्यांनी वर्णन केले आहे.

**रॉबिन शर्मा** यांनी "The Monk Who Sold His Ferrari" ही दंतकथा लिहिली. ती अध्यात्म, योग, भक्ती याच्या सूत्रांवर आधारित आहे. जगातल्या या बेस्ट सेलिंग पुस्तकाचा अनुवाद "संन्यासी ज्याने आपली संपत्ती विकली" या पुस्तकात आहे. पॉलो कोयल्हो (अल्केमिस्ट चे लेखक) यांनीही या पुस्तकाचा गौरव केला आहे. या ऐतिहासिक -आध्यात्मिक कथानकात-

ज्युलियन याने (शिवाना या योग्यांच्या आश्रमात) रॉबिन यांना आनंदी राहण्याची कला सांगितली. त्यात ज्युलियन म्हणतो-

"आनंदी आणि उत्साहपूर्ण राहण्यासाठी मन एकाग्र कर. तू असा विचार मनात आण की तुला फार आनंद झाला आहे. कदाचित तू थोडासा हास. अशी शारीरिक कृती कर ज्या तू नेहमी आनंदी असताना करतोस. ताठ बैस, असा दीर्घ श्वास घे आणि मनावर काबू कर. आनंदी विचार-कल्पना मनात आण."

यामुळे काही मिनिटातच नकारात्मक, उदासीन, विकारमुक्त विचार-तरंग नाहीसे होतील. गळ्यात रुद्राक्षांची माळ असली की नकारात्मक विचार आल्यावर त्याला स्पर्श करावा. म्हणजे सजगताही राहते. अश्या क्लृपत्या यात आहेत. दंतकथा स्वरूपातील हे लेखन आहे.

भक्तीमार्ग, भक्ती, भक्तीयोग, भक्तीरस हा अध्याय प्रकारच्या शुभ-सकारात्मक मानस-कल्पना भावना-भाव ऊर्जा-संवेदना स्फुरण यांनी भरलेला व भारलेला आहे.

"अमृतवाणी" हा **रामकृष्ण परमहंसांच्या** उपदेशांचा संग्रह श्रीरामकृष्ण मठ, मद्रास यांनी केलेल्या "Sayings of Shri Ramkrishna" उपदेशांचा अनुवाद आहे. त्यामध्ये श्रीरामकृष्णांनी विषद केलेल्या भक्ती विषयीच्या बोधाचाही समावेश आहे.

रामकृष्ण म्हणतात की जेवढी "विषयासक्ती" घटेल तेवढी भक्ती वाढेल. भक्तीमुळे मन आणि प्राण ईश्वराच्या ठायी विलीन होतात, भावसमाधी लागते. मनुष्य निर्धास्त आणि नि:स्तब्ध होऊन जातो. केवल कुंभक साधतो. कोणती तरी एक भावना पक्की धरून ठेवा मग तिच्याद्वारे ईश्वराला वश करता येईल. ईश्वरावर जेवढे प्रेम कराल तेवढे त्याच्या जवळ जवळ जाल असे रामकृष्ण म्हणत. ईश्वराविषयी प्रेम जेवढे वाढेल तेवढे विषयसुख कमी होईल. काम-क्रोध-इत्यादी रीपूंना भक्ति विसर्जित करेल. रामकृष्ण म्हणत.

"ईश्वराविषयी अनुराग म्हणजे भक्ती आणि प्रेम पाहिजे; म्हणजे मग विवेक, वैराग्य, जीवदया, साधूसेवा, सत्संग, ईश्वराच्या महिन्याचे गुणगाण, सत्यवचन, इत्यादी सद्गुणांचा हृदयात आपोआप उदय होतो."

भक्ती ही सात्विक, राजसिक, तामसिक तिन्ही प्रकारे होते असेही रामकृष्णांनी म्हटले आहे. भक्तीमुळे बाह्य जगाचे, देहाचे ही विस्मरण होऊन आनंदरस-भक्तिरस सुगंधतो, प्रकाशतो, असे रामकृष्ण परमहंस मानीत.

रामकृष्ण परमहंसांनी आत्मचरित्र लिहिले नाही. परंतु त्यांच्या सानिध्यातील शिष्यांनी त्यांच्या शिकवणुकीचे जतन केले आहे. रामकृष्ण म्हणतात की ज्ञानी म्हणेल "सोऽहं" (मी परमात्मा) परंतु भक्त म्हणेल- "अहाहा ! हा सगळा त्याचाच महिमा."

## निष्कर्ष

प्रस्तुत शोधात काही तथ्ये पुढे आली निष्कर्षरूपात ती अशी सांगता येतील-

१. भक्तीने अध्यात्म मार्गदर्शकांच्या, प्रबोधकांच्या व्यक्तीगत जीवनावरही प्रभाव टाकलेला दिसतो. त्यांच्या आत्मचरित्रात अनेक प्रतिकूल, दुःख-वेदनामय, संकटग्रस्त, निंदाजनक, नकारात्मक प्रसंग आलेले आढळतात. परंतु भक्तीमुळे त्यांना शुभ-सकारात्मक भावऊर्जा व जीवनचैतन्य मिळाल्याचे आढळते. त्यांनी स्वतःचा भक्तीचा अनुभव व अनुभूती ही प्रबोधन व मार्गदर्शनाद्वारे इतरांना दिली .

२. विविध अध्यात्मिक प्रबोधकांनी-मार्गदर्शकांनी भक्तीचा भावार्थ वेगवेगळा लावला आहे. त्यांनी स्वानुभूतीवर व चिंतनावर आधारित "भक्ती" ही संकल्पना अभिव्यक्त केली आहे .

३. "भक्ती" ही "मुक्ती"साठी सहज, सोपी साधना पद्धती असल्याचे प्रबोधकांचे मत आढळते तसेच "भक्ती" व "मुक्ती" हेच जीवनाचे ध्येय असल्याचे त्यांच्या आत्मचरित्रातून आढळते .

४. "भक्ती" हा नकारात्मकतेच्या विषावरचा उतारा असून, भक्ती उगाळल्याने मन-चित्त-जीवन वृत्ती या उदात्त भावभावनांनी प्रकट होतात, असा संदेश प्रस्तुत आत्मचरित्रात आढळतो .

५. तात्विक दृष्ट्या फरक असूनही, वेगवेगळे उपासना मार्ग असूनही भक्तिमार्गाचे ध्येय मात्र "मुक्ती-आत्मज्ञान-ईश्वरलीनता" हेच असल्याचे या आत्मचरित्राच्या शोध व बोधातून आढळते .

**समारोप**

आधुनिक भारताच्या इतिहासात प्राचीन काळापासून नांदत आलेली भक्ती परंपरा प्रचलित आहे. कालसापेक्ष त्यात काही परिवर्तने घडली. विविध प्रांतात भक्तीचा धार्मिक-सांस्कृतिक प्रवाह हा अविरत आहे. भक्तीने समाज व व्यक्ती मनातील मूल्ये ही वाढवून "मूल्य निर्देशांकात" भर टाकली आहे. आधुनिक भारतातील अध्यात्मिक प्रबोधकांनी भक्तीचे आधुनिक काळातील तत्वज्ञान, बोध व शिकवणूक वेळोवेळी प्रस्तुत केली. ती त्यांच्या

आत्मचरित्रे, डायरीज याद्वारे संकलित राहिली आहेत. प्राचीन भक्ती प्रवाह हा आधुनिक भारतातही कायम राहून पुढील काळासाठी मूल्यांचा वारसा हा जतन झाला आहे.

**संदर्भ सूची**

१. चटोपाध्याय अशोक कुमार, पुराणपुरुष योगीराज लाहिरी महाराज, योगीराज पब्लिकेशन, कोलकत्ता, सहावी आवृत्ती, ऑगस्ट २०१०, पृष्ठ 201

२. परमहंस योगानंद, योगी कथामृत (मराठी अनुवाद), योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया, दुसरी आवृत्ती-1976, पृष्ठ 211

३. गांधी मो. क., सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा (मराठी अनुवाद), नवजीवन ट्रस्ट, अहमदाबाद, तिसरी आवृत्ती -फेब्रुवारी 2013, पृष्ठ 249

४. डॉक्टर ब्रन्टन पॉल, भारताच्या आध्यात्मिक रहस्याच्या शोधात (मराठी अनुवाद), वोरा अँड कंपनी-मुंबई, पाचवी आवृत्ती, 1998, पृष्ठ 215

५. प्रधान जी.के., साद देती हिमशिखरे (मराठी अनुवाद- डॉक्टर जोशी रामचंद्र), भारतीय विद्याभवन, पुणे केंद्र, 11 वी आवृत्ती, 15 फेब्रुवारी 1998, पृष्ठ 234

६. स्वामी मुक्तानंद, चिदशक्ती विलास, गुरुदेव सिद्धपीठ-गणेशपुरी, ठाणे, प्रथमावृत्ती-१ मे 1970, पृष्ठ 222

७. स्वामी राम, हिमालयातील महात्म्यांच्या सहवासात (मराठी अनुवाद-भीशीकर स्वर्णलता), मंजुळ पब्लिशिंग हाउस, नवी दिल्ली, दुसरी आवृत्ती, 2013, पृष्ठ 195

८. कित्ता, पृष्ठ 196

९. कित्ता, पृष्ठ 196

१०. श्री.एम. (मुमताज अली खान), हिमालयवासी गुरूच्या योगी शिष्याचे आत्मकथन (अनुवाद-पटवर्धन श्री.वा.) मॅजेन्टा पब्लिकेशन, कर्नाटक, तृतीय आवृत्ती 2013, पृष्ठ 242

११. कित्ता, पृष्ठ 242

१२. शर्मा रॉबिन, संन्यासी ज्याने आपली संपत्ती विकली, जयको पब्लिकेशन हाऊस, मुंबई, 14 वी आवृत्ती 2009, पृष्ठ 56

१३. रामकृष्ण परमहंस, अमृतवाणी, श्रीरामकृष्ण मठ-धंतोली, नागपूर, 1996, पृष्ठ 174